
INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 4.1625(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 12 | JANUARY – 2017

# जुन्नरच्या अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांची गौरव गाथा



डॉ. एम. बी. वाघमारे
श्री शिवछत्रपती महाविद्यालय,
जुन्नर , ता. जुन्नर, जि. पुणे.

प्राचीन भारताच्या इतिहासात जसे जुन्नरला अनन्यसाधारण महत्व आहे तद्वतच आधुनिक भारताच्या इतिहासातही जुन्नरचे स्थान महत्वाचे आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये अनेक क्रांतीकारकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले आहे. त्यामध्ये जुन्नरमधील जनताही मागे नव्हती. आपले सर्वस्व पणाला लावून, प्रसंगी आपल्या घरादारावर तुळशीपत्र ठेवून या स्वातंत्र्यलढ्यात झोकून दिले आहे. या क्रांतीकारकांच्या बलिदानातूनच या देशाला स्वातंत्र्य मिळाले आहे. या स्वातंत्रलढ्याचे शेवटचे पर्व म्हणून १९४२ च्या चले जाव आंदोलनाकडे पाहिले जाते. या आंदोलनामध्ये जुन्नरच्या स्वातंत्र्यसैनिकांचाही सहभाग होता. १९४२ च्या आंदोलनाला सुरुवात होण्यापूर्वीच सर्व राष्ट्रीय नेत्यांना ब्रिटीशांनी पकडून वेगवेगळ्या ठिकाणी अत्यंत गुप्तपणे ठेवले होते. त्यामुळे हा लढा नेतृत्वहीन झाला असला तरी येथील स्थानिक नेत्यांनी आपआपल्या परीने तीव्र लढा देऊन इंग्रजांना सळो की पळो करुन सोडले होते. या शोधनिबंधामध्ये आतापर्यंत इतिहासापासून अज्ञात राहिलेल्या जुन्नरच्या स्वातंत्र्यसैनिकांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा लढा हा एकट्या माणसाचा नव्हता. तर स्वातंत्र्यप्रमाने भारलेल्या लोकांचा होता. कित्येकांना तुरुंगवास भोगावा लागला आहे. दंडुक्याचा मार खावा लागला आहे. त्याला जुन्नरही अपवाद नाही. भारतीय स्वातंत्र्याची चळवळ एस.एम. जोशींच्या रुपाने जुन्नरच्या उंबरठ्यापर्यंत येऊन ठेपली होती. स्वातंत्र्याचे बाळकडू ज्या जुन्नरने शिवरायांच्या रुपाने चाखले आहे ते जुन्नर स्वातंत्र्यलढ्याच्या कामात मागे कसे राहील्?

१९४२ च्या चले जाव आंदोलनात जुन्नर तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिकांनी मोलाचे योगदान दिले आहे. यावेळी जुन्नरच्या कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. केशव पांडुरंग खडके हे होते. यांच्या नेतृत्वाखाली जुन्नरमध्ये चळवळ राबविली जात होती. यांना कुस्त्यांचा छंद असल्याने त्यांनी तरुण पिढीला बलदंड बनवून स्वातंत्र्य चळवळीकडे ओढले होते. समाजसुधारक केशवराव जेधे यांच्याबरोबर त्यांचा स्नेह होता. १९३८.३९ च्या दरम्यान जुन्नर तालुक्यात जंगल सत्याग्रह करण्याचा इरादा आपल्या सहकार्यांना त्यांनी बोलावून दाखविला. त्यानुसार मावळ पट्टा, मढ, येणेरे, पारुंडे या परिसरामध्ये जंगल सत्याग्रह केला. त्याला अभूतपूर्व यश

आले०[१] जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे मा. केशवराव खडके यांनी पत्री सरकार शिबीर आयोजित केले होते. सात दिवसांच्या या पत्री सरकारमध्ये शत्रुला बातम्या पोहोचविणारे जे चार जण होते, त्यांच्या पायात पत्र्या ठोकल्या होत्या. सन १९४२ च्या आंदोलनामध्ये त्यांनी स्वत:ला झोकून दिले होते. त्यांच्याबरोबर सरजीने, भगत, नायकोडी, विश्वासराव पेंटर, नानासाहेब हांडे, शिरसाठ, डुंबरे, तांबे या आडनावांची खुप माणसे होती. पुढे ही चळवळ भूमिगत झाल्याने हे सर्व सहकारी देखील भूमिगत झााले. जुन्नर तालुक्यात ही चळवळ चांगलीच जोमात पसरली. स्वातंत्र्यचळवळीतील विविध सहभगाबद्दल त्यांना नाशिक कारागृहात सहा महिने आणि येरवडा कारागृहात दोन वर्षे सजा झाली आहे. त्यांच्या या राष्ट्रीय कार्याबद्दल माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हस्ते ताम्रपट देऊन गौरव करण्यात आला आहे.[२] सविनय कायदेभंग चळवळीमध्ये जुन्नरच्या स्वातंत्र्यसैनिकांनी भाग घेतला होता. देशभक्त बाबू गेणू यांच्या वीरमरणाच्या वेळी हे स्वत: त्यांच्यासोबत सहभागी झाले होते. पोलीसांच्या दंडुक्याच्या माराने अंगाचे सालपट निघाले होते. सत्याग्रहात सहभागी झाालेल्या विसापूर आणि येरवडा कारागृहात सजा झाली होती. सध्या ते ग्रामपंचायत ओझर ंन. १ मध्ये साफसफाईचे व पाणीपुरवठ्याचे काम करतात.[३] (इ.स. २००७ मध्ये त्यांची मुलाखत घेतली होती. परंतू सध्या ते हयात आहेत की नाहीत माहित नाही.) जुन्नर तालुक्यातील राजुरी या गावातील मा. गंगाधर काळे यांचा स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग निश्चितच वाखाणण्याजोगा आहे. यांनी गुप्तरित्या दारुगोळा कारखान्यातून एक माणूस धरुन आणला आणि, चाळकवाडी ता. जुन्नर येथे गुप्तरित्या हातबॉम्ब बनविण्याचा उद्योग चालविला. नारायणगांव ता. जुन्नर येथील पोलीस स्टेशन उडवुन देण्यासाठी त्यांची ही सर्व धडपड होती. यासाठी त्यांनी रामोशी लोकांची मदत घेतली. त्यांना तशा प्रकारच्या सुपाऱ्या दिल्या. परंतू दुर्दैवाने रामोशातील एक दोघे जण फुटले आणि बेत पूर्णत:: फसला. पोलीसांनी धाडी टाकल्या आणि त्यामध्ये कटाचे प्रमुख म्हणून गंगाधर काळे यांना अटक करण्यात आली. यांच्यावर खटला चालवला गेला. ॲड श्री. बन्याबापू जोशी यांनी स्वातंत्र्यसैनिकांचे कोणतीही फी न घेता वकीलपत्र घेतले व या सर्वांना येरवडा कारागृहातून निर्दोष मुक्त केले. यांना अस्पृश्यता आवडत नव्हती. आणि म्हणूनच अस्पृश्यता निवारण्याचा कार्यक्रम आपल्या गावात आपण राबविला पाहिजे यासाठी त्यांनी थेट साने गुरुजींशी संपर्क साधला आणि इ.स. १९४३ मध्ये साने गुरुजींना राजुरी या ठिकाणी आणले. त्यांच्या समवेत मोठा कार्यक्रम घेतला. आपल्या स्वत:च्या घरी साने गुरुजी यांच्या समवेत अस्पृश्यांना बोलावून सहभोजन घेतले. राष्ट्रसंत विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीत प्रत्यक्ष कृतीने सहभाग नोंदविला. स्वत:च्या मालकीची जमीन भूदान चळवळीला अर्पण केली. सध्या या जागेवर हायस्कुलची भव्य दिव्य इमारत उभी आहे. त्यांच्या या कार्याची केंद्र सरकार व राज्य सरकारने देखल घेऊन मा. पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हस्ते ताम्रपट देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे.[४] जुन्नर तालुक्यात एकापेक्षा एक सरस असे क्रांतीकारक होते. मा. चंद्रकांत खत्री हे त्यापैकीच एक होते. इंग्रजी चौथीच्या वार्षिक परिक्षेत नापास झााल्याने पुढे या शाळेचे तोंड पहायचे नाही असे ठरवून ते तडक आपल्या आजोळी म्हणजेच कोल्हापूरला निघून गेले. याच काळात त्यांचा देशभक्त बाबुराव महाडीक यांच्याशी संबंध आला. देशसेवेची आवड निर्माण झाली. इ.स. १९४२ ची चळवळ सुरु झाली होती त्यावेळी त्यांचे वय २२ वर्षाचे होते. ऐन तारुण्यातील या तरुणाने राष्ट्रीय चळवळीत स्वत:ला झोकून दिले. त्यावेळी करवीर चरखा संघाचे प्रमुख मा. माधवराव पोर्टे यांच्याकडून हातबॉम्ब तयार करण्याची कला अवगत केली. हा हातबॉम्ब बनवताना व्हॅसलीनच्या बाटलीत काचांचे तुकडे, ग्रामोफोनच्या टोकदार पिना, धारदार छोट्या छोट्या वस्तू आणि स्फोटक द्रव्यांचा वापर केला जात असे. एके दिवशी हा गावठी बॉम्ब बनवताना चुकुन त्याचा स्फोट झाला. त्यामध्ये पोर्टे जबर जखमी झाले. स्फोटाच्या आवाजाने पोलीसांचा गराडा पडला, परंतू अत्यंत चळपाईने नी हुशारीने खत्री व त्यांचे सहकारी निसटले आणि तडक जुन्नरला आले. येथे येऊन त्यांनी गुप्तपणे आपले काम चालू ठेवले. श्री. बाबुराव खडके यांच्या सहकार्याने गावठी बॉम्ब बनवणे, संकेतस्थळी स्फोटके पोहोचविणे, बुलेटिन्स वाटणे यांसारखी कामे सुरु केली. यांचाही शासनाने ताम्रपट व सन्मानपत्र देऊन गौरव

केला आहे. [५] मा. तुकाराम धोंडू खत्री यांनी देखील १९४२ च्या लढ्यात सहभाग घेतला आहे. यावेळी ते जुन्नर तालुका कॉग्रेस कमिटीचे चिटणीस होते. त्यांनीदेखील विविध ठिकाणी गावठी बॉम्ब पोहोचविणे, झेंडा सत्याग्रह, सरकार विरोधी घोषणा देऊन जनमत घडविणे यांसारखी कामे केली आहेत. यासाठी त्यांना जेलमध्ये जावे लागले आहे. मा. खडके यांच्या अटकेनंतर तालुक्याची सर्व सुत्रे यांच्याकडेच राहीली आहेत. पोलीसांचा ससेमिरा चुकविण्यासाठी जवळजवळ ७—८ महिने जुन्नरच्या दऱ्याखोऱ्यातून जंगलातून गुप्तपणे प्रवास करावा लागला आहे. याच काळात त्यांनी अत्यंत विश्वासू अशी एक लढाऊ फौज तयार केली. या कार्यामध्ये त्यांच्याबरोबर जीवाला जीव देणारी राष्ट्राला सर्वस्व अर्पण करणारी माणसे मिळाली. या सर्वांनी उठाव करण्याचे ठरविले. परंतू यावेळी देखील पोलीसांच्या खबऱ्याकरवी त्यांना बातमी समजते आणि होऊ घातलेला उठाव अपयशी ठरतो. या कार्यात त्यांच्यासमवेत श्री. गंगाधर काळे, श्री. वाघ, श्री. नानासाहेब हांडे, श्री. केळकर ही मंडळी होती. यांचाही शासनाच्या वतीने गौरव करण्यात आलेला आहे. [६] इ.स. १९४२ च्या आंदोलनामध्ये मा. सोनू भिकू वाव्हळ, मा. शंकर बजाबा सुतार ओतूर ता. जुन्नर या स्वातंत्र्यसैनिकांनी देखील सहभाग घेतला होता. यांनाही सजा होऊन येरवडा जेलमध्ये पाठविण्यात आले होते. [७] जुन्नर येथील मा. रामचंद्र शिवराम शिंदे या स्वातंत्र्यसैनिकाचे नाव आदराने घ्यावे लागते. १ एप्रिल १८९८ रोजी जन्मलेल्या या स्वातंत्र्यसैनिकाने शिक्षणापेक्षा समाजकार्याला जास्त महत्व दिले. त्यामुळे ते कॉग्रेसच्या कार्याकडे आपोआप वळले आणि कॉग्रेसचे क्रियाशील कार्यकर्ते बनले. महात्मा गांधीजींनी सुरु केलेल्या असहकार चळवळीमध्ये यांनी सहभाग घेतला होता. जंगल सत्याग्रहात सहभाग घेतला होता. त्यामुळे विसापूर व येरवडा जेलमध्ये तीन—तीन महिन्यांसाठी कैद करण्यात आले होते. महात्मा गांधींसोबत काम करायला मिळाले म्हणून त्यांना खूप अभिमान वाटत असे. त्यांच्या सोबत राघु कवडे व राजाराम परदेशीसह १५ ते २० स्वयंसेवक होते. जुन्नरचे लोक त्यांना आदराने 'सरकार' म्हणत होते. शासनाने त्यांना मानपत्र देऊन सन्मान केला आहे. [८] मा. दशरथ गेणूजी वामन यांनीही या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला आहे. हे स्वत: गवालीया टॅक या ठिकाणी झालेल्या सभेला हजर होते. त्यामुळे ते जास्तच प्रभावी झाले होते. श्रीपाद केळकरांच्या मदतीने बनविलेल्या हातबॉम्बने नारायणगावची पोलीस चौकी उडविण्याचा त्यांचा बेत होता. परंतू राजूरच्या विठ्ठल रामोशी याने पोलीसांना माहिती दिल्याने हा बेत फसला. यामध्ये त्यांना अटक होऊन येरवड्याच्या कारागृहात पाठविण्यात आले. महाराष्ट्र शासनाने मानपत्र देऊन त्यांचाही गौरव केलेला आहे. ओतूर ता. जुन्नर येथील मा. नानासाहेब गोविंदराव हांडे यांना लहानपणापासूनच समाजसेवेची आवड होती. त्याचाच परिणाम म्हणून की काय यांनी इ. स. १९२० ते २२ दरम्यान चालविल्या गेलेल्या असहकार व खिलाफत चळवळीत प्रत्यक्ष सहभाग घेतला होता. जुन्नरला १९४० च्या दरम्यान राष्ट्रसेवा दलाची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये त्यांना गजानन खत्री, भालचंद्र पुरवंत, दत्तात्रय घाटे यांचे सहकार्य लाभले. त्यांच्या समवेत नजीम खान, उस्मान खान येणेरे येथील युसुफ भाई हे कार्यकर्ते देखील होते. १९४२ च्या मोहरममध्ये कत्तलची रात्र ज्या दिवशी होती त्या दिवशी नानासाहेबांनी मुस्लीम गोषा घालून जुने पोस्ट ऑफिस पेटवून दिले. त्यावेळेस त्यांना अष्टेकर नावाच्या इन्स्पेक्टरने पकडले व पुढे येरवडा जेलकडे रवाना केले. परंतू पोलीसांची नजर चुकवून नानासाहेब पसार झाले. त्यामध्ये एक पोलीस सस्पेंड झाला. पुढे त्यांनी ओतूरला येऊन ओतूरचे पोस्ट ऑफिस व शाळा जाळली. जुन्नरच्या तेली फौजदाराने एका हरिजन मुलीची छेड काढल्यामुळे नानासाहेबांनी त्याला चांगलाच चोप दिला. पोलीस त्यांच्या पाळतीवरच होते. शेवटी मोरोशी ता. मुरबाड, जि. ठाणे खंडेराव भाऊराव देशमुख यांच्या घरी अचानकपणे पोलीसांनी त्यांना पकडले आणि अत्यंत जबाबदारीने येरवडा जेलमध्ये पाठविले. पुढे १९४७ नंतरच त्यांची सुटका झाली. शासनाने त्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव केला आहे. [१०] नानासाहेबांच्या बरोबर दत्तात्रय घाटे यांनीदेखील काम केले आहे. राजुरी येथे साने गुरुजी आले असताना त्यांच्यासोबत मंदिर सत्याग्रह केला. जुन्नरचे पोस्ट ऑफिस जाळताना नानासाहेबांसोबत राहून त्यांना मदत केली होती. [११] त्याचप्रमाणे पारुंडे ता. जुन्नर येथील सौ. हौसाबाई पवार आणि त्यांचेसोबत विष्णु बहिरु पवार यांनी जंगल

सत्याग्रह केला असता, जुन्नरच्या मांढरे इन्स्पेक्टरने त्यांना अटक करुन येरवडा जेलमध्ये पाठविले. [१२] ओतूरच्या शंकर कोंडाजी डुंबरे यांनीदेखील स्वातंत्र्यचळवळीमध्ये स्वत:ला झोकून दिले होते. त्यांनी केलेल्या कामगिरीमुळे सरकारने २४/०२/१९४३ ते २४/१२/१९४३ पर्यंत राहत्या घरीच स्थानबध्द केले होते. रोज सकाळी व संध्याकाळी पोलीस हजेरी घेत होते. महाराष्ट्र शासनाने त्यांचा मानपत्र देऊन गौरव केला आहे. [१३]

थोडक्यात भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये जुन्नर तालुक्याचा खुप मोठा सहभाग होता. मा. एस. एम. जोशी यांच्यासारखे स्वातंत्र्यसेनानी हे जुन्नरचेच होते. परंतू त्यांच्यावर खूप लिखाण झाले असून ते इतिहासाला परिचित आहेत. या शोधनिबंधामध्ये काही मोजक्याच स्वातंत्र्यसैनिकांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. जे इतिहासापासून दूर, वंचित राहिलेले आहेत त्यांना इतिहासाच्या प्रवाहात आणण्याचा हा प्रयत्न होता. उपरोक्त स्वातंत्र्यसैनिक हयात नसले तरी त्यांच्या नातेवाईकांजवळ त्यांचे अस्सल कागदपत्रे आहेत. त्याची झेरॉक्स प्रत माझ्याकडे आहे. या स्वातंत्र्यसैकिांनी आपआपल्या परीने काम करुन भारतीय स्वातंत्र्य संग्रामास हातभार लावला आहे. त्यांच्या या कार्यास शतशः प्रणाम.

## संदर्भसूची


1) मा. केशव पांडुरंग खडके यांचे चिरंजीव मधुकर केशव खडके यांनी समक्ष प्रत्यक्ष माहिती दिली. यावेळी त्यांनी मुळ कागदपत्रे दाखवली. दि. 20/07/2007

2) मा. केशव पांडुरंग खडके यांची कन्या शोभना खडके यांची प्रत्यक्ष मुलाखत दि. 24/07/2007

3) प्रत्यक्ष मुलाखत दि. ०९/०८/२००६

४) मा. गंगाधर काळे यांचे चिरंजीव हरिश्चंद्र गंगाधर काळे यांची प्रत्यक्ष मुलाखत दि.२२/०७/२००७

५) प्रत्यक्ष मुलाखत दि. ०९/०८/२००६

६) स्वत:च्या हस्ताक्षरात माहिती लिहून ठेवली आहे. त्यांच्या मुलाकडून ती घेतली.

७) मा. सोनू भिकू वाव्हळ यांच्या मुलाने माहिती लिहून दिली त्याचप्रमाणे मा. शंकर बजाबा सुतार यांच्या नातेवाईकाने मुळ कागदपत्रावरुन दिलेली माहिती. दि. ०१/०८/२००७

८) मा. रामचंद्र शिवराम शिंदे यांच्या मुलाने मुळ कागदपत्रांवरुन दिलेली माहिती दि. ०४/०८/२००७

९) मा. दशरथ गेणुजी वामन यांच्या मुलाने मुळ कागदपत्रांवरुन दिलेली माहिती दि. १२/०७/२००७

१०) मा. नानासाहेब गोविंदराव हांडे यांच्या नातेवाईकाने मुळ कागदपत्रांवरुन दिलेली माहिती दि. २०/०७/२००७

११) प्रत्यक्ष मुलाखत दि. २०/०७/२००७

१२) मा. दत्तात्रय घाटे यांच्या मुलाखतीतून मिळालेली माहिती दि. २०/०७/२००७

१३) नातेवाईकांनी मुळ कागदपत्रावरुन दिलेली माहिती दि. २१/०७/२००७